महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
प्रकाशगड, ४था मजला, प्रा. अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व),मुंबई–४०००५१ दूरध्वनी. २६४७४२११,२६४७२१३१
Website:www.mahadiscom.com, E-mail :www.amsalary@mahadiscom.in

मासं / वेतन व देयके/30424

दिनांक :- 07.11.2013

# परिपत्रक

**विषय :- अंतीम उपदान व अंतीम रजा रोखीकरण अदा करते वेळी आयकर कायदयातील कलम '१०' उपकलम '१० - अ अ' नुसार आयकरातून सुट देणेबाबत.**

कंपनीमधुन सेवानिवृत्त होण-या कर्मचारी / अधिकारी यांचे अंतीम उपदान व अंतीम रजा रोखीकरण अदा करतेवेळी आयकर कायदा, १९६१ मधील तरतुदीनुसार आयकर कपातीबाबत क्षेत्रीय कार्यालयांकडुन योग्य ती कार्यवाही होत नसल्याचे निदेर्शनास आले आहे.

२) सर्व क्षेत्रीय कार्यालयांना सुचीत करणेत येते की, सेवानिवृत्त कर्मचारी / अधिकारी यांचे अंतीम उपदान व अंतीम रजा रोखीकरण अदा करतेवेळी, आयकर कायदा, १९६१ चे कलम '१०' उपकलम '१० - अ अ' नुसार आयकर कपाताबाबतची कार्यवाही करावी.

३) सेवानिवृत्त कर्मचारी / अधिकारी यांना अंतीम उपदान कायदा, १९७२ नुसार देय असलेल्या रुपये १०,००,०००/- (दहा लाख) पर्यतच्या अंतीम उपदानावर आयकर बसत नसलेबाबत व अंतीम उपदान परिगणनेसंदर्भात, मुख्य कार्यालयाने परिपत्रक क्र. HRD / S&C/ Gratuity /10420 Dtd. 23.04.2012 अन्वये सुचना निर्गमित केल्या आहेत त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

४) अंतीम रजा रोखीकरण संदर्भात, आयकर कायदयामध्ये, अर्जीत रजेंवर रु.३,००,०००/- (तीन लाख) पर्यत सुट देण्याची तरतुद आहे व त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

५) सबब, क्षेत्रीय कार्यालयांनी व सांघिक कार्यालयाने सेवानिवृत्त कर्मचारी / अधिकारी यांचे अंतीम उपदान व अंतीम रजा रोखीकरण अदा करतेवेळी, आयकर कायदा, १९६१ च्या तरतुदीचे पालन करावे.

६) सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी व सांघिक कार्यालयाने वरील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे. यामध्ये अनियमितता अढळल्यास सबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

७) सदरचें परिपत्रक कंपनीच्या इट्रांनेंटवरील "HRD - CIRCULAR" वर उपलब्ध आहे.

**(संदेश हाके)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं)**

प्रत रवाना:-
प्रेषण यादी प्रमाणे विभागीय कार्यालयापर्यत.